सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

४था मजला, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई-४०० ००१
दुरध्वनी - (०२२) २२६२६००७ दुरध्वनी - (०२२) २२६२२२४७
ईमेल- directorayurvedmaha@gmail.com संकेतस्थळ- www.mahaayush.in

# - : जाहिरात : -

आयुष संचालनालय व अधिनस्त शासकीय कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी, गट-ब (राजपत्रित) या संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी यांच्या सेवा करार पध्दतीने मानधन तत्वावर विवक्षित कामासाठी नामिकासूची करण्याकरिता मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | संवर्ग | पदसंख्या | विवक्षित कामाचे स्वरुप | वय अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | गट ब (राजपत्रित) (वेतन संरचना एस १५ : ४१८००-१३२३००) | १ | विशिष्ट प्रकारचे प्रशासकीय कामकाज पहाणे, न्यायालयीन प्रकरणे हाताळणे. | वयोमर्यादा - ५८ ते ६४<br>अर्हता - पदवीधर<br>अनुभव - १) गट -ब (राजपत्रित) प्रशासकीय अधिकारी (वेतनसंरचना एस १५ : ४१८००-१३२३००) पदावर ५ वर्षाचा अनुभव.<br>न्यायालयीन कामकाज ५ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक काळ हाताळण्याबाबतचा अनुभव असल्यास प्राध्यान्य. |

नियुक्तीच्या अटी व शर्ती :-

१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं(का.१३), दिनांक १० जून २०२५ अन्वये नियुक्तीच्या अटी व शर्ती विनियमित करण्यात येतील.

२. करारपध्दतीने आयुष संचालनालयामध्ये नियुक्त केलेल्या व्यक्तींना कोणतेही पदनाम असणार नाही.

३. करार तत्वावरील नियुक्त व्यक्तीस अर्जित, नैमित्तिक व वैद्यकीय रजा अनुज्ञेय असणार नाही.

४. नियुक्तीच्या कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी करारपध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तीची असेल.

५. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय/वित्तीय अधिकार नसतील. अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र / आदेश यावर स्वाक्षरी करण्यास पात्र असणार नाही. इच्छुक सेवानिवृत्त अधिकारी यांनी त्यांचे अर्ज आवश्यक त्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रासह ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसापर्यंत सादर करावेत.

संपर्क:- आयुष संचालनालय, शासकीय दंत महाविद्यालय आणि रुग्णालय इमारत, चौथा मजला सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१

दूरध्वनी :- ०२२- २२६२२२४७
ईमेल :- directorayurvedmaha@gmail.com

Signed by
Anil Bhandari
Date: 01-08-2025 22:31:44

आयुक्त
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष